FORM-1A

0058165

N.C.R.B.
I.I.F.-I

# पहिली खबर

# FIRST INFORMATION REPORT

**फौजदारी प्रक्रिया संहितेच्या कलम १५४ अन्वये ( Under Section 154 Cr. P.C.)**

1. राज्य State: महाराष्ट्र, जिल्हा District: मुंबई, पोलीस ठाणे Police Station: ला.प्र.वि. मुंबई, पहिली खबर क्र. FIR No.: १७, वर्ष Year: 2024, दिनांक Date: 23/05/2024

2. (i) अधिनियम Act: भ्र.प्र. अधिनियम १९८८, कलमे Sections: ७
   (ii) अधिनियम Act ..........., कलमे Sections ...........
   (iii) इतर अधिनियम व कलमे Other Acts and Sections ...........

3. (a) अपराधाची घटना : वार Occurrence of offence : Day ..........., तारीख पासून Date from 10.03.2023 वेळ Time 12.30 वा. दरम्यान, तारीख पर्यंत Date to 10.03.23, वेळ Time 15.00 वा. दरम्यान
   वेळेचा अवधी (प्रहर) (योग्य ठिकाणी ✓ अशी खूण करा) (Tick applicable portion).
   (1) 00.00 ते 03.00 (2) 03.00 ते 06.00 (3) 06.00 ते 09.00 (4) 09.00 ते 12.00 (5) 12.00 ते 15.00
   (6) 15.00 ते 18.00 (7) 18.00 ते 21.00 (8) 21.00 ते 24.00 (9) 06.00 ते 18.00 (5) 18.00 ते 06.00
   (b) पो. ठा. ला माहिती मिळाल्याची Information received at P. S. तारीख Date: 27/11/2023, वेळ Time ...........
   (c) गुन्हा दाखल झालेचा सर्वसाधारण स्टेशन डायरीचा नोंद क्र. General Diary Reference : Entry No. ..........., तारीख Date: 23.05.24 वेळ Time: 12:30

4. माहितीचा प्रकार Type of Information: लेखी अर्जाद्वारे, लेखी / तोंडी Written / Oral: लेखी

5. गुन्हा घडल्याचे ठिकाण (a) पोलीस ठाण्यापासून अंतर व दिशा Place of Occurrence : (a) Direction and distance from P. S. ..........., चौकी / बीट / दूरक्षेत्र नाव व क्र. Chouki / Beat / O.P. Name and No. ...........
   (b) गुन्हा घडल्याचे ठिकाणाचे नाव Address of Occurrence Name: सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय ठाणे, ठिकाणाचे नंबर No. if any ..........., गल्ली Ward: सेक्टर दहा, रस्त्याचे नाव Name of road: राम मारुती रोड
   जवळचे ओळख चिन्ह / ठिकाण Nearest identifiable place: गजानन महाराज मंदिराजवळ, गाव Village ..........., पोस्ट Post ..........., ठाणे (प) तालुका Taluka ..........., जिल्हा Dist.: ठाणे, राज्य State: महाराष्ट्र
   (c) पोलीस ठाणेचे हद्दीबाहेर असल्यास त्या पो.स्टे.चे नाव In case, outside the limit of this Police Station ..........., तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ...........

6. तक्रारदार / खबर देणाराचे नाव व पत्ता Complainant / Informant : Permanent Address.
   (a) नाव Name: रायन राजकुमार
   (b) वडिलांचे / पतीचे नाव Father's / Husband's Name: राजकुमार येसुदासन
   (c) जन्म तारीख व वय Date of Birth and Age: 08/03/2000
   (d) राष्ट्रीयत्व Nationality: भारतीय, फोन नं. Phone No.: 7045208714
   (e) पारपत्र क्रमांक Passport No. ..........., दिल्याचा दिनांक Date of Issue ..........., दिल्याचे ठिकाण Place of Issue ...........
   (f) व्यवसाय Occupation ...........
   (g) धर्म Religion: ख्रिश्चन, जात Caste ..........., जनजात Sub-Caste ...........
   (h) पत्ता Address: भक्ती प्लॉट नं. 84, फ्लॅट नं. 403, सेक्टर 18, उलवे नवी मुंबई
   गल्ली / सर्व्हे नं. Ward ..........., घर / नाव नं. House/Name No. ..........., फोन / मो. नं. Phone/M. No. ..........., पॅन नं. PAN No. ..........., वोटर्स नं. Card No. ...........
   रस्त्याचे नाव Road ..........., जवळचे प्रसिद्ध ठिकाण Nearest identifiable place ..........., गाव Village ..........., पोस्ट Post ..........., पो. स्टे. P. Stn. ...........
   तालुका Taluka ..........., जिल्हा Dist. ..........., राज्य State ..........., सध्याचा पत्ता Present Address: वर नमूद प्रमाणे

7. माहिती असलेल्या आरोपीचे संपूर्ण नाव व पत्ता (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा.) (संशयिताचे वर्णन प्र. ख. रिपोर्टच्या फॉर्म 1-B वर वेगळ्या शिटवर घेऊन तपासिक अंमलदाराच्या प्रथम खबरीला व सं. अभियोक्ता यांच्या फाईलला जोडावे.)
   Details Name and Address of known Accused (Attach separate sheet, if necessary.) (If suspect particular of physical feature write on form 1-B of attach FIR 1-B to case diary.)
   प्रविण अशोक मालशिकारे 36 वर्षे, धंदा नोकरी (निरीक्षक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय) रा. 6, गगनगिरी को.ऑप.हौ.सो. सेक्टर ८, कोपरखैरणे, नवी मुंबई



ASSTT. COMM... ANTI-CORRUPT... MUM...

Scanned with OKEN Scanner

यातील फिर्यादी नामे रायन राजकुमार, ख्रि/ २४ वर्षे, रा.ठि. श्रीकृपा फ्लॅट नं. 84, रुम नं 403, सेक्टर, 18 उलवे नवी मुंबई, यांच्या स्व स्वतंत्र कागदावर टंकलिखीत केलेला जबाब हाच या गुन्ह्यातील प्रथम खबरी अहवाल म्हणुन संबोधण्यात यावा.

समक्ष

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक
ला.प्र.वि. मुंबई.

Ryan..

Fir. Copy Received.

Ryan.

Scanned with OKEN Scanner

दिनांक २३/०५/२०२४

फिर्याद

मी रायन राजकुमार, वय- २३ वर्षे, व्यवसाय - खाजगी नोकरी, रा. श्रीकृपा फ्लॅट नंबर ४०३, प्लॉट नंबर ८४ सेक्टर १८ उल्वे, नवी मुंबई, मोबाईल नंबर - ७०४५२०८७१४, आधार कार्ड नंबर - ७६९९०५७६११३७, पॅन कार्ड क्रमांक - **EDGPR5503G**

मी आज दिनांक २३/०५/२०२४ रोजी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई येथे उपस्थित राहून माझा जबाब नोंदवित आहे की, मी वरील ठिकाणी माझी आई जिना राजकुमार, भाउ रॉबिन राजकुमार यांचेसह एकत्रित राहण्यास असून माझे बी.एस.सी. कॉम्प्युटर सायन्स पर्यतचे शिक्षण पिल्लई कॉलेज, पनवेल येथून २०२१ मध्ये पुर्ण केले आहे. सध्या मी ॲमेझॉन प्रोसेस सदर लॅण्ड, ऐरोली, नवी मुंबई येथे ॲमेझॉन एजन्ट म्हणून कामाला आहे.

सन २००७ मध्ये माझे वडील नामे राजकुमार येसुदासन यांनी बेथेल गोस्पेल चॅरिटेबल ट्रस्टची स्थापना केली. सदर ट्रस्टची धर्मादाय आयुक्त कार्यालय येथे नोंदणी करण्यात आली असून त्याचा क्रमांक E – 4470 ( Thane) असा आहे. व त्याचा पत्ता फ्लॅट नं. १०२, प्लॉट नं.१०३, कैलासनाथ माधवी को.ऑ.ही.सोसायटी, सेक्टर १९-ए, नेरूळ, नवी मुंबई ४०० ७०६ असा आहे. नमुद ट्रस्टमध्ये एकूण ०३ ट्रस्टी होते. त्यामध्ये १) राजकुमार येसुदासन, २) श्रीमती जीना येसुदासन, ३) सेल्वमनी येसुदासन असे तीन ट्रस्टी होते. सदर ट्रस्टचे १)एचडीएफसी बॅंक, सी वुडस् शाखा येथे बचत खाते क्र. १०२८१४५००००००२५, २) कॅनरा बॅंक,सेक्टर-४८, सी वुडस् शाखा येथील खाते क्र.२७६६१०१००५४६२ याठिकाणी खाते आहे. मी बेथेल गोस्पेल ट्रस्टमध्ये कोणत्याही पदावर कार्यरत नाही.

बेथेल गोस्पेल ट्रस्टकरीता कर्जत येथे साधारणत: तीन एकर जमीन खरेदी करण्याकरीता लिजिन अब्राहम यांचेसोबत १५/०९/२०२१ रोजी समझोत करारनामा झाला असून सदरची जमीन खरेदीचा व्यवहार रु.१ कोटी ३५ लाख ठरलेला होता. व सदरची रक्कम वेळोवेळी देण्याचे ठरले होते. सदर रक्कमेपैकी आम्ही हफ्त्या हफ्त्याने रु.३५ लाख दिलेले होते. तसेच ओडिसा येथे ट्रस्टकरीता जमीन खरेदी केली असून तीचे मुल्य रु. १ लाख ७६ हजार इतकी असल्याचे मला माहिती आहे.

माझे वडील राजकुमार यशोदासन यांनी प्लॉट नंबर २९, सेक्टर ४८ सीवूड्स नवी मुंबई ४००७०६ याठिकाणी सिडकोच्या जागेवर चर्च बांधायाचे असल्याने परवानगी मिळणे कामी सिडको येथे अर्ज दिला होता त्याची तारीख मला माहिती नाही, परंतू सिडको येथून परवानगी मिळाली नसल्याने सन २००७ मध्ये बेथेल गोस्पेल पेन्टीकॉस्टल चर्च बांधले होते. त्यानंतर सन २०१९ मध्ये चर्च मध्ये ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाही अशा कुटुंबातील मुलांना ठेवून त्यांना मोफत शिक्षण, जेवण व त्यांचा सर्व खर्च पाहण्याचे काम चालू केले. त्यामुळे ज्या कुटुंबाची आर्थिक परिस्थिती नाही अशा कुटुंबातील लहान मुले आमच्या चर्च मधील शेल्टर होम मध्ये दाखल होवू लागली. आतापर्यत ४५ मुले-मुली चर्च मधील शेल्टरहोम मध्ये राहण्यास होती. आमचे चर्च मध्ये लहान व गरीब मुले, निराधार लोक, वृध्द लोक असल्याने आजूबाजूचे लोक छोटे कार्यक्रम घेण्यासाठी चर्च मध्ये येत होती, तसेच देणगी देखील ट्रस्टला मिळत असल्याने एचडीएफसी बॅंक, सी वुडस् शाखा येथे बचत खाते क्र.१०२८१४५००००००८३ या ठिकाणी खाते असून त्यामध्ये जमा होत असलेल्या देणगीतून बेथेल गोस्पेल चॅरिटेबल ट्रस्टचे विश्वस्त वास्तव्यास असलेल्या मुलांच्या देखभालीचा सर्व खर्च करीत होते.

दिनांक ०५/०८/२०२२ रोजी सकाळी ११.०० बाल कल्याण समिती ठाणे येथील अधिकाऱ्यांनी आमच्या शेल्टर होमवर केलेल्या कारवाईनंतर एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नेरुळ, नवी मुंबई येथे दिलेल्या तक्रारीवरुन श्री. राजकुमार येशोदासन यांचेवर पोक्सो कायद्यांतर्गत एकूण ०४ गुन्हे नोंद करण्यात आले. सदर गुन्ह्यामध्ये माझे वडीलांना अटक करण्यात आली असून आजतागायत ते न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत.

बेथेल गोस्पेल शेल्टर होमवर कारवाई झाल्यानंतर शेल्टर होम बंद करण्यात आले तसेच बेथेल गोस्पेल ट्रस्टची मान्यता रद्द करणे, ट्रस्ट काळया यादीत टाकणेबाबत सीडब्ल्युसी, ठाणे येथील रामकृष्ण रेड्डी यांनी दिनांक २६/०९/२०२२ रोजी धर्मदाय आयुक्त कार्यालय ठाणे याठिकाणी लेखी तक्रार केली असल्याने धर्मदाय आयुक्त कार्यालय, ठाणे येथील निरीक्षक प्रविण माळशिकरे यांनी ट्रस्टसंबंधी कागदपत्रे व माहिती घेवून धर्मादाय आयुक्त,ठाणे कार्यालयात दिनांक २९/११/२०२२ रोजी उपस्थित राहणेबाबत ट्रस्टचे विश्वस्त यांना दिनांक २४/११/२०२२ रोजी नोटिस दिली होती. सदरची नोटिस ट्रस्टची

Ryan

Ryan Rajkumar

Scanned with OKEN Scanner

(०४)

विश्वस्त म्हणून माझी आई श्रीमती जीना राजकुमार हिस प्राप्त झाल्याने मी तिचेसमवेत दिनांक २९/११/२०२२ रोजी धर्मदाय आयुक्त कार्यालय, ठाणे येथे गेलो होतो कार्यालयात गेल्यानंतर सदरची नोटीस प्रविण माळशिकारे यांनी काढलेली असून त्यांचेकडे ट्रस्टची चौकशी असल्याचे आम्हाला समजले त्यामुळे आम्ही प्रविण माळशिकारे यांना भेटल्यानंतर त्यांनी त्यावेळी रामकृष्ण रेड्डी यांनी केलेल्या अर्जाची प्रत माझ्या आईला मिळाली होती. त्यावेळेस ट्रस्टच्या अनुषंगाने मागणी केलेली माहिती सादर करणेबाबत मुदत मिळणेकरीता माझ्या आईने लेखी अर्ज दिला असता दिनांक १६/१२/२०२२ रोजी पुढील सुनावणीची तारीख प्रविण माळशिकारे यांनी आम्हाला दिली होती.

दिनांक १६/१२/२०२२ रोजी मी, माझी आई व माझा भाऊ रॉबिन असे धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे येथे गेलो. त्यादिवशी ट्रस्टसंबंधाने कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्याने पुढील तारीख मिळणेकरीता लेखी अर्ज दिला असता दिनांक ०३/०१/२०२३ अशी पुढील तारीख देण्यात आली होती. दिनांक १३/०२/२०२३ रोजी देखील आम्ही नमुद कार्यालयात जावून ट्रस्टसंबंधाने दोन ते तीन वर्षाच्या ऑडीट रिपोर्ट निरीक्षक प्रविण माळशिकारे यांना दाखविला परंतु मागणीप्रमाणे कागदपत्रांची पुर्तता झाली नसल्याने पुढील तारीख मिळणेकरीता लेखी अर्ज दिला असता दिनांक २७/०२/२०२३ अशी पुढील तारीख देण्यात आली होती त्यावेळी मी ट्रस्टच्या अनुषंगाने काही कागदपत्रे सादर केली होती. तसेच ट्रस्टकरीता कर्जत येथे जमीन खरेदी करण्याकरीता रु.३५ लाख दिल्याचे त्यांना सांगितले होते. सदरचा व्यवहार रद्द करणार असल्याबाबत माहिती दिली होती. त्याचप्रमाणे ओडिसा येथे १ लाख ७६ हजार रुपयांना जमीन खरेदी केल्याचे त्यांना माहिती दिली होती. कर्जत येथील जमिनीचा व्यवहार रद्द केल्यानंतर आलेली रक्कम असे मिळून एकंदरीत चाळीस लाख रक्कम ट्रस्टच्या अकाउंटला शिल्लक राहिल असे त्यांना सांगितले होते.

दिनांक २७/०२/२,०२३ रोजी माझी आई धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे येथे गेली असता धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे कार्यालयातील निरीक्षक प्रविण माळशिकारे यांनी ट्रस्ट वाचवायचा असल्यास किती पैसे देणार असे माझ्या आईला विचारले होते, परंतु किती रक्कम याबाबत काहीही सांगितले नसल्याचे माझे आईने मला माहिती दिली होती. त्यादिवशी कागदपत्रांची पुर्तता करणेकामी मुदत वाढवून मिळणेकरीता पुन्हा लेंखी अर्ज दिला असता दिनांक १०/०३/२०२३ अशी पुढील तारीख दिली होती.

दिनांक १०/०३/२०२३ रोजी सुनावणीची तारीख मिळाल्याने तसेच निरीक्षक प्रविण माळशिकारे यांनी पैशांची मागणी केल्याचे माझ्या आईने मला सांगितल्याने सुनावणीकरीता पुढील तारीख मिळणेबाबत आईने दिलेला अर्ज धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे येथे देण्याकरीता मी स्वत: गेलो होतो. त्यावेळी मी निरीक्षक, प्रविण माळशिकारे यांना १२:३० वा.चे सुमारास भेटलो. माझेकडे आय फोन ११ ( IMEI- 1 356157216269140 IMEI - 2 356157216406908, MEID 35615721626914 ) हा मोबाईल असून त्यामध्ये व्हॉईस मेमोस हे इनलबिल्ड ॲप्लिकेशन आहे. सदर ॲप्लिकेशन हे व्हॉईस रेकॉर्डीग करण्याकरीता उपयोगात आणतात. प्रविण माळशिकारे हे पैसे मागण्याची शक्यता वाटत असल्याने मी त्यांना भेटताना त्यांचेशी चर्चा सुरु करण्यापुर्वी माझे मोबाईलमधील व्हॉईस मेमोस ॲप्लिकशन सुरु करुन मोबाईल शर्टाच्या खिशामध्ये ठेवून प्रविण माळशिकारे यांचेशी चर्चा सुरु केली, त्यामध्ये आमचे संभाषण रेकॉर्डिग झाले आहे.

**संभाषणा दरम्यान मी प्रविण माळशिकारे यांना '' आप टेन पर्सेंट बोला तो मेरे को'' असे प्रविण माळशिकारे यांचेकडे विचारणा केली असता प्रविण माळशिकारे यांनी '' देख तेरे को बोल रहा मैं तेरा कितना है, ये कितना होता है, चालीस लाख है लाख पुरा है ना (कॅल्क्युलेटर वर रक्कम दाखवतो)'' असे विचारुन कॅल्क्युलेटर दाखविले असता ''(कॅल्क्युलेटर वरची रक्कम पाहुन) हा चार लाख'' असे सांगितले. त्यावर प्रविण माळशिकारे यांनी '' कितना बन रहा है'' असे विचारले असता मी '' चार लाख '' असे सांगितले असता प्रविण माळशिकारे यांनी '' तुम तुम्हारे हिसाब से देखे ना यार, १०% ही तो बनता है इसमे का, बाकी तुम्हारा ही है तुम करो, तुम ही निकालो '' असे सांगितले.**

प्रविण माळशिकारे यांचेशी झालेल्या चर्चेदरम्यान त्यांनी मला ट्रस्टच्या खूप तक्रारी अर्ज येत आहेत. ट्रस्ट बंद करा असे सांगून तुमची ट्रस्ट बंद करायची नसल्यास पैसे द्यावे लागतील असे सांगून सदरबाबत धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे येथे यापुर्वी सादर केलेल्या कागदपत्रांमध्ये ट्रस्टकरीता कर्जत येथे जमीन खरेदी करण्याकरीता रु.३५ लाख दिल्याचे तसेच ओडिसा येथे १ लाख ७६ हजार रुपयांना जमीन खरेदी केल्याचे त्यांना माहिती दिल्याने त्याआधारें कर्जत येथील जमिनीचा व्यवहार रद्द केल्यानंतर तेथील जमिनीकरीता दिलेले रु. ३५ लाख व ओडिसा येथील मालमत्ता असे त्यांनी चाळीस लाख

Ryan Rajkumar.

Scanned with OKEN Scanner

ट्रस्टच्या अकाउंटला जमा होणार असून सदर रक्कमेच्या १० टक्के म्हणजे चार लाख रुपयाची मागणी माझेजवळ केली. माझे मोबाईलवर आमचे दोघांमध्ये झालेले संभाषण रेकॉर्डींग झाले असून सदर रेकॉर्डींग मी मोबाईल फोन मधील ICICI BANK असे नाव दिलेल्या २५ मिनिटे २१ सेकंद इतक्या कालावधीचे,१२.७ एमबी चे रेकॉर्डींग सेव्ह करुन ठेवले असून ते अद्यापपर्यंत माझेकडे उपलब्ध आहे.

माझे वडील चालवित असलेल्या शल्टर होमवर कारवाई झाल्यानंतर बाल कल्याण समितीचे पल्लवी जाधव व रामकृष्ण रेड्डी यांनी एनआरआय सागरी पोलीस ठाणे याठिकाणी पोक्सो अंतर्गत गुन्हे दाखल केल्यानंतर मी प्रविण माळशिकारे तसेच पोलीस, बालकल्याण समितीचे कर्मचारी, एनजीओ, खाजगी इसम अशा एकूण २३ व्यक्ती यांचेविरुद्ध मा. पोलीस आयुक्त, नवी मुंबई येथे दिनांक १९/०३/२०२३ रोजी तसेच मा.सहाय्यक पोलीस आयुक्त, तुर्भे विभाग कार्यालय येथे दिनांक १८/०९/२०२३ रोजी व नेरूळ पोलीस ठाणे येथे साधारण १७/१०/२०२३ मध्ये तक्रारी अर्ज दिले होते. परंतू सदर तक्रारी अर्जाचे अनुषगाने त्यांचेवर गुन्हे दाखल झाले नसल्याने मी दिनांक २१/११/२०२३ रोजी पुन्हा माळशिकारे व इतर २३ व्यक्ती यांचे विरूद्धचा तक्रारी अर्ज ला.प्र.वि. कार्यालय मुंबई येथे दिला तसेच अर्जासोबत मी माझे आय फोन ११ (IMEI- 1 356157216269140 IMEI - 2 356157216406908, MEID 35615721626914 ) मधील व्हॉईस मेमो हे इनलबिल्ड ॲप्लिकेशन मध्ये रेकॉडींग केलेले संभाषण तसेच ॲड किरण बर्मा यांनी बाल कल्याण समितीचे श्री. रामकृष्ण रेड्डी यांचेसोबत झालेले संभाषण त्यांनी त्यांचे मोबाईल मधून गुगल ड्राईव्हवरुन मला पाठविले त्यानंतर मला संगणक हाताळण्याचे ज्ञान असल्याने मी स्वत: माझे मोबाईलला यूएसबी कनेक्टर जोडून त्यातील माहिती San Disk कंपनीचा 64 GB क्षमतेचा पेन ड्राईव्हमध्ये घेतले असून त्यामध्ये माझे व प्रविण माळशिकारे यांचे संभाषण असलेल्या फाईलला Pravin Malshikare – Charity असे नाव दिले असून Date of Modified 25-07-2023 Type MP4 File o Size 15,38,509 KB आहे.सदरचा पेन ड्राईव्ह लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, वरळी, मुंबई येथे तपासी अधिकारी पो.नि. बनसोडे यांचेकडे दिला असता त्यांनी सदर पेन ड्राईव्हवरील रेकॉर्ड केलेले संभाषण ऐकून वेळोवेळी सदर संभाषणामधील आवाजाची माझेकडून खात्री करुन घेवून ट्रान्स क्रिप्ट बनविण्यात आली.

मी केलेल्या अर्जाचे अनुषंगाने सतत पाठपुरावा करत असल्याने माझे अर्जावरुन करण्यात आलेल्या चौकशीच्या अहवालावरुन प्रविण माळशिकारे याचेविरुध्द उघड चौकशी क्र.०८/२४ अन्वये चौकशी सुरु करण्यात आली.तदनंतर उघड चौकशी ०८/२४ मध्ये चौकशी दरम्यान माझा, माझी आई श्रीमती जिना राजकुमार असे आमचे जबाब नोंदविण्यात आले. सदरवेळी आम्ही बेथेल गोस्पेल ट्रस्ट संबंधी कागदपत्र सादर केले तदनंतर सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे येथील निरीक्षक प्रविण माळशिकारे, तसेच त्यांचे सहकारी निरीक्षक दिनेश पवार व किशोर चव्हाण यांचे जबाब नोंदविण्यात आले तसेच संबंधित कार्यालयाकडून कागदपत्रे प्राप्त केली असता सदरचे काम प्रविण माळशिकारे यांचेकडे प्रलंबित असल्याचे दिसून आले. सदर चौकशी करुन त्याबाबतचा अहवाल मा. वरिष्ठांना सादर केला असता प्रविण माळशिकारे याचेविरोधात गुन्हा नोंद करण्याचे आदेश देण्यात आल्याने आज रोजी मला बोलाविलेवरुन समक्ष उपस्थित राहून माझे वडील श्री.राजकुमार येसुदासन व माझी आई श्रीमती जिना येसुदासन हे विश्वस्त असलेल्या बेथेल गोस्पेल ट्रस्टवर बंदीची तसेच ट्रस्ट काळया यादीत टाकणेबाबतची कारवाई होवू नये याकरीता लोकसेवक प्रविण माळशिकारे, निरीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे यांनी १० **%** प्रमाणे रु.४,००,०००/- रक्कमेची मागणी केली असून माझी लोकसेवक प्रविण माळशिकारे, निरीक्षक, धर्मादाय आयुक्त कार्यालय, ठाणे यांचेविरोधात कायदेशीर फिर्यादी आहे. तसेच त्यांचेविरोधात योग्य ती कायदेशीर कारवाई होणेस माझी विनंती आहे.

माझा वरील संगणकावर घेतलेला जबाब प्रिंट काढल्यानंतर मला तो हिंदी भाषेत समजावून सांगितला असता तो मी सांगितल्याप्रमाणे बरोबर टंकलिखीत केलेला आहे.

समक्ष

(सुरज बनसोडे)
पोलीस निरीक्षक
लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, मुंबई

Ryan Rajkumar.

Scanned with OKEN Scanner

8. तक्रारदाराने / फिर्यादीने तक्रार करण्याकरिता झालेल्या विलंबाची कारणे फि. यांनी सादर केलेल्या अर्जाच्या उघड चौकशी
Reasons for delay in reporting by the complainant/informant अहवाल व फि यांच्या तक्रारीवरुन.

9. चोरीस गेलेल्या/अंतर्भूत मालमत्तेचा तपशील (आवश्यकतेनुसार नमुना फॉर्म जोडावा) सविस्तर मजकूर पाठीमागे लिहावे.
Particulars of properties stolen and involved (Attach necessary Proforma) write down details on blank back page.

.....................................................................................................................

10. (a) चोरीस गेलेल्या / अंतर्भूत मालमत्तेचे एकूण मूल्य .................................................................
Total Value of properties stolen / involved
(b) चोरीची मिळालेली मालमत्ता (Recovered Properties)

11. अकस्मात मृत्यू / अपघाती मृत्यू असल्यास त्याचा क्रमांक .................................................................
Unnatural / Accidental Death Case No., if any

12. पहिल्या खबरीची थोडक्यात हकिगत (आवश्यक असल्यास स्वतंत्र कागद जोडावा) सविस्तर पाठीमागील कोऱ्या पानावर लिहावे.
First Information brief contents (Attach separate sheet, if required) : Detail write down back blank page.

थोडक्यात फि. यांचे वडील राजकुमार येसुदासन हे बेथेल गोस्पेल ट्रस्ट, नेरुळ येथील विश्वस्त असून त्यांचेविरोधात एनआरआय सागरी पोलीस ठाणे, नेरुळ येथे बाल कल्याण समिती, ठाणे यांनी केलेल्या तक्रारीवरुन पोक्सो अंतर्गत ० दाखल करण्यात आले असून सध्या ते न्यायालयीन कोठडीमध्ये आहेत. बालकल्याण समितीचे रामकृष्ण रेड्डी यांनी जातीने न्यास नोंदणी कार्यालय, ठाणे, येथे बेथेल गोस्पेल ट्रस्टवर कारवाई होणेबाबत अर्ज सादर केल्या होता. सदर कारवाई न होण्याकरीता आलोसे प्रविण माळशिकारे यांनी फि. यांचेकडे १०. लाखाचे व न: ५ लाख रक्कमे मागणी केली होती. फि. यांना आलोसे यांना त्यांनी मागणी केलेप्रमाणे रक्कम देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी ला.प्र.वि येथे सादर केलेले अर्ज व पुरावे, कागदपत्रे, माहिती यांचे आधारे चौकशी केली असता त्यामध्ये निष्पन्न बाबी, व फिर्यादी यांची तक्रारवरुन ला.प्र.वि. मुंबई येथे भ्र.प्र.अधिनियम ~~१~~ 1988 कलम 7 अन्वये गुन्हा नोंद.

13. **केलेली कार्यवाही** – 1. वरील फिर्यादीवरून कॉलम नं. 2 मधील कलमाप्रमाणे गुन्हा दाखल करून तपासावर घेतला, तपास करण्याचे आदेश दिले त्या तपासिक अंमलदाराचे नाव व हुद्दा :
.....................................................................................................

2. तपास नाकारण्यात आला त्याचे कारण,
.....................................................................................................

3. दुसऱ्या पोलीस ठाण्याकडे वर्ग करण्यात आला. पोलीस स्टेशन........................., जिल्हा....................., राज्य.....................

Action taken : Since the above information reveals Commission of offence (s) u/s as mentioned at Item No. 2 :

(1) Registered the case and took up the Investigation or Directed (Name of I.O.)................ Rank............... No............... to take up the Investigation or

(2) Refused Investigation due to................................................ (3) Transferred to P. S. ............................................ District................................................. on point of jurisdiction.

तक्रारदाराने / फिर्यादीने फिर्याद वाचून पाहिली. फिर्याद वरोबर लिहिली असल्याचे पाहून / वाचून / ऐकून बरोबर नोंदविली असल्याचे त्याने मान्य केले व त्याची एक प्रत त्यास विनामूल्य देण्यात आली.

F.I.R. read over to the Complainant / informant, admitted to be correctly recorded and a copy given to the Complainant/ informant, free of cost.

(R.O.A.C.)

14. तक्रारदाराची सही व अंगठा
Signature and Thumb impression
of the Complainant / Informant.

पोलीस ठाणे प्रभारी अधिकाऱ्याची सही.
Signature of Officer in-charge, Police Station
संपूर्ण नाव Name सुरज बनसोडे
पदनाम Rank पोलीस निरीक्षक
तपासिक अं. चा कोड क्र. ला.प्र.वि., मुंबई
Posting
Code No. of I. O. ..........................................

15. 1. न्यायालयास सादर केल्याची तारीख...................
1. Date and time of submitted to the Court.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| प्रत, | 2. फिर्यादी, | 3. पोलीस अधीक्षक (संगणक), | 4. तपासिक अंमलदार, | 5. स्थळ प्रत. |
| Copy to | 2. Complainant, | 3. Supdt. of Police (Computer), | 4. Inv. Officer, | 5. Office Copy. |

Attachment to item 7 of **First Information Report**

Scanned with OKEN Scanner